**ठळक बातम्या**

- १९ व्या रोजगार मेळ्यातून देशातल्या ५१ हजार युवकांना सरकारी नियुक्तीपत्रांचं वितरण

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो यांच्याशी नवी दिल्लीत चर्चा

- महाराष्ट्रात शिर्डी इथं देशातल्या सर्वात मोठ्या खासगी संरक्षण उत्पादन प्रकल्पाचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते उद्घाटन

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा वाढ, पेट्रोल ८७ पैशांनी तर डिझेल ९१ पैशांनी महाग

**आणि**

- चीनमधे कोळसा खाणीत झालेल्या स्फोटातल्या मृतांची संख्या ९० वर

**<><><><><>**

भारताच्या विकासयात्रेत सहभागी व्हायला जग उत्सुक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे. ते आज १९ व्या रोजगार मेळ्याला दूरस्थ पद्धतीने संबोधित करत होते. नुकत्याच केलेल्या ५ देशांच्या दौऱ्याचा उल्लेख करुन ते म्हणाले की तरुणांना संधी, रोजगार आणि जागतिक ओळख उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सरकार विविध देशांबरोबर भागीदारी करत आहे. परदेशात शाश्वत ऊर्जा, स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण केल्या जात आहेत, असं ते म्हणाले.

**होल्ड-बाईट – नरेंद्र मोदी -**

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यात येत आहे, असंही मोदी म्हणाले. हा रोजगार मेळा देशभरातल्या ४७ ठिकाणी आयोजित करण्यात आला. देशभरातून निवडलेले ५१ हजार नवनियुक्त उमेदवार, रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि उच्च शिक्षण विभाग यांसारख्या विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये रुजू होतील.

नागपूर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत आज रोजगार मेळ्याचं आयोजन करण्यात आलं. केंद्र सरकारच्या नोकरीमध्ये रुजू होणाऱ्या नवनियुक्तांनी देशाच्या

विविध भागात सेवा करताना आपल्याला मिळालेल्या जबाबदारीचं चांगल्या रीतीने पालन करण्याचं आवाहन गडकरी यांनी यावेळी केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्याशी नवी दिल्लीत चर्चा केली. चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आलेले रुबियो यांनी नवी दिल्लीत सेवा तीर्थ इथं प्रधानमंत्र्यांची भेट घेतली. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर आणि राष्ट्रीय संरक्षण सल्लागार अजित दोवाल यावेळी उपस्थित होते. भारत - अमेरिका भागीदारी जागतिक परिप्रेक्ष्यात मजबूत होत असल्याबद्दल यावेळी चर्चा झाली. व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, संपर्क जाळं, शिक्षण अशा विविध क्षेत्रात उभय देशांमधले संबंध अधिकाधिक दृढ होत असल्याचं रुबियो यांनी प्रधानमंत्र्यांना सांगितलं. क्वाड देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक येत्या मंगळवारी होणार असून त्याकरता रुबियो भारतात आले आहेत.

<><><><><>

आपला देश पूर्वी शस्त्रास्त्रांच्या क्षेत्रात जगातला मोठा आयातदार होता, आता पुढील २५-३० वर्षांत भारत शस्त्रास्त्रांचा निर्यातदार बनेल, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रात शिर्डी इथं उभारण्यात आलेल्या देशातल्या सर्वात मोठ्या खासगी संरक्षण उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

या संरक्षण सामग्री उत्पादन संकुलात क्षेपणास्त्र निर्मिती, तोफगोळे उत्पादन, दारुगोळा पार्क, ड्रोन तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक संरक्षण उपकरणांची निर्मिती केली जाणार आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे , संरक्षण विभागाचे सचिव डॉ. समीर कामत, निबे ग्रुपचे गणेश निबे उपस्थित होते.

संरक्षण क्षेत्रात पूर्वी खासगी उद्योगांची भूमिका अत्यल्प होती. आज ती सुमारे २५ ते ३० टक्के आहे आणि येत्या काळात ती ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचा आमचा मानस आहे. आज ज्याचं उद्घाटन झालं ते क्षेपणास्त्र संकुल याच बदलाचं द्योतक आहे. सरकारचे स्वप्न आणि खासगी क्षेत्राची सर्जनशीलता एकत्र येते तेव्हा राष्ट्र नवी उंची गाठते, असं प्रतिपादन राजनाथ सिंह यांनी केलं.

**<><><><><>**

जागतिक अस्थिर वातावरणातही भारताचा आर्थिक पाया मजबूत असून निर्यातीत जोरदार वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. एप्रिल मध्ये झालेली निर्यात वाढ मे महिन्यातही कायम राहिल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांना वाढत्या उत्पादन खर्चापासून वाचवण्यासाठी खतांच्या वाढीव किंमतींचा भार सरकारनं उचलला असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

सार्वजिनिक क्षेत्रातल्या इंधन तेल कंपन्यांनी आज पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ केली. त्यामुळे पेट्रोल प्रति लिटर ८७ पैशांनी, तर डिजेल प्रति लिटर ९१ पैशांनी महागलं आहे. त्यामुळे मुंबईत पेट्रोलचा दर १०८ रुपये ४९ पैसे प्रति लिटर, तर डिझेलचा दर ९५ रुपये २पैसे प्रति लीटर झाला आहे. गेल्या ९ दिवसात तिसऱ्यांदा इंधन दरवाढ झाली आहे.

पश्चिम आशियात भूराजकीय संघर्ष सुरु झाल्यानंतर इंधन तेल पुरवठ्यात अडचणी निर्माण होऊन जागतिक स्तरावर इंधनाचे दर कडाडले आहेत.

**<><><><><>**

पेट्रोलियम पदार्थांच्या दरवाढीवरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकावर टीका केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमी असूनही सरकार पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजीची दरवाढ करून जनतेवर वाढीव बोजा लादत असल्याचं ते म्हणाले. समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे त्यांनी ही टीका केली आहे.

**<><><><><>**

देशात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा नसल्याची हमी इंडियन ऑईल या कंपनीनं ग्राहकांना तसंच सर्वसामान्य नागरिकांना दिली आहे. काही ठरावीक विक्री केंद्रांवर सध्या उद्भवलेली परिस्थिती ही केवळ स्थानिक पातळीवर असून तात्पुरत्या स्वरूपाची असल्याचं इंडियन ऑईलनं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. स्थानिक पातळीवर मागणी आणि पुरवठ्यात असंतुलन निर्माण झाल्यानं तसंच विक्री पद्धतीमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचं कंपनीचं म्हणणं आहे. या महिन्याच्या १ ते २२ तारखेपर्यंत या इंधनांच्या विक्रीत गेल्या

वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाल्याचं कंपनीनं म्हटलं आहे. पेट्रोल विक्रीत १४ टक्के तर डिझेल विक्रीत १८ टक्के वाढ झाल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

शेतकऱ्यांना आवश्यक तितका डिझेलचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना निर्देश दिले असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. संरक्षण आणि क्षेपणास्त्र संकुलाच्या उद्घाटनासाठी शिर्डी इथं आले असताना ते माध्यमांशी बोलत होते. ग्रामीण भागात इंधन सहज उपलब्ध होत नसल्यानं या सूचना केल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

'नीट २०२६' पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने पुण्यातून आणखी एका शिक्षिकेला अटक केली आहे. मनीषा संजय हवालदार असे अटक करण्यात आलेल्या शिक्षिकेचे नाव असून त्या भौतिकशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेशी संबंधित असल्याचे तपासात समोर आले आहे.

<><><><><>

झारखंडच्या लातेहारमध्ये पाच लाखांचं बक्षीस असणाऱ्या झारखंड जनमुक्ती परिषद या बंदी घातलेल्या संघटनेच्या दोन नक्षलवाद्यांना झारखंड पोलिसांनी आज अटक केली. सब-झोनल कमांडर शिवनारायण सिंह उर्फ शिवा आणि एरिया कमांडर शुकुलदेव उरांव अशी त्यांची नावं आहेत. पोलीस अधिक्षक कुमार गौरव यांनी आज माध्यमांना ही माहिती दिली.

<><><><><>

चीनमध्ये काल झालेल्या स्फोटातल्या मृतांची संख्या ९० वर पोहोचली आहे. शांकी परगण्यातल्या कोळसा खाणीत हा गॅसचा स्फोट झाला होता. बचाव कार्य सुरू असून आतापर्यंत २०१ खाणकामगारांची सुटका करण्यात आली आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

दिल्ली उच्च न्यायालयानं कुस्तीपटू विनेश फोगटला २०२६ आशियाई खेळांच्या निवड चाचणीत सहभागी होण्याची परवानगी दिली आहे. येत्या ३० आणि ३१ मे रोजी या चाचण्या होणार आहेत. भारतीय कुस्ती महासंघाचं धोरण संपूर्णपणे अपवादात्मक स्वरूपाचं

असून फोगटसारख्या दिग्गज खेळाडूला तिनं घेतलेल्या विशेष मातृत्व रजेमुळे स्पर्धेतून वगळण्याचा अधिकार महासंघाला प्राप्त होत नाही असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं आहे. मुख्य न्यायमूर्ती डी के उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठानं हा निर्णय दिला आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात लखनौ इथं सामना सुरू आहे. पंजाबने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनौ सुपर जायंट्सच्या सात षटकात तीन बाद ७१ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//